प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO
WE MAKE CITIES

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६-०६-२००९

# संपूर्ण वैद्यकीय तपासणी योजना

सिडकोत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण वैद्यकीय तपासणीची योजना सुरू करण्यात आली आहे. बॉम्बे हॉस्पिटल येथे कर्मचाऱ्यांच्या सर्व वैद्यकीय तपासण्या करण्यात येणार आहेत, यात सर्व प्रमुख आजारांची तपासणी व त्याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. वर्तमान जीवनशैली, धक्काधकीचे जीवन, ताणतणाव यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. वेळीच उपाययोजना म्हणून सर्वजण खबरदारी घेतच असतात. शिवाय महामंडळाने ही नवीन योजना लागू करून या सजगतेबाबत आणखी पुढाकार घेतला आहे.

वयोमानानुसार वाढत जाणाऱ्या प्रकृतीच्या अशा समस्या टाळण्यासाठी संपूर्ण शारीरिक चाचणी आवश्यकता जाणून अध्यक्ष मा.श्री. नकुल पाटील, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.जी.एस. गिल्ल, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जाधव, संचालक श्री. नामदेव भगत व श्री. सुभाष भोईर यांनी कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या मागणीला मान्यता दिल्याबद्दल सिडको कर्मचारी संघटनेच्या वतीने सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. निलेश तांडेल व सरचिटणीस श्री. मिलिंद बागुल समस्त संचालक मंडळाचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली.

**सिडको कर्मचारी संघटनेच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न**

सिडको कर्मचारी संघटना आणि स्विट होम क्लिनिक, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ व ६ मे २००९ दरम्यान मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले.

या शिबीरात ब्लड शुगर टेस्ट, ब्लड प्रेशर, फॅट्स, बॉडी मास इंडेक्स व बालाल मॅटॅबॉलिक रेट या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. या आरोग्य शिबीराला सिडको कर्मचाऱ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती

कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ____________________

____________________